# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.04.2026** **वार: मंगळवार**

---

1. देशाच्या नागरी अणु ऊर्जेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा पूर्ण; पंतप्रधानांकडून शास्त्रज्ञांचं अभिनंदन
2. आसाम, केरळम आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार आज थंडावणार
3. युद्धविराम करार न केल्यास इराणला पूर्णपणे उद्ध्वस्त करण्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा आणि
4. आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताच्या खेळाडूंची घोडदौड सुरू

**<u>नागरी अणुऊर्जा</u>**

भारताच्या दीर्घकालीन नागरी अणुऊर्जा धोरणाचा महत्त्वाचा भाग असलेल्या; तामिळनाडूमधील कल्पक्कम इथल्या स्वदेशी बनावटीच्या 'प्रोटोटाइपफास्ट ब्रीडर रिॲक्टर'नं एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे. अणुभट्टीमध्ये पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती होण्यापूर्वीचा हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. हा निर्णायक टप्पा पर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अणुभट्टीशी संबंधित शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांचं अभिनंदन केलं आहे. भारतासाठी हा अभिमानाचा क्षण आहे; या प्रक्रियेमुळे भारतानं नागरी अणु ऊर्जेच्या वाटचालीत एक निर्णायक पाऊल टाकलं असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. कल्पक्कम इथल्या प्रगत अणुभट्टीची ऊर्जा निर्माण क्षमता मोठी असून ती देशाच्या वैज्ञानिक क्षमता आणि अभियांत्रिकी उपक्रमाची ताकद दर्शवते; देशात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या थोरियम साठ्याचा वापर करण्याच्या दिशेनं आपण प्रगती करत असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

**<u>निवडणूक-पंतप्रधान</u>**

आसाम, केरळम आणि पुद्दुचेरी इथल्या विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचाराच्या तोफा आज थंडावणार आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आसाममधील बारपेटा, होजाई आणि दिब्रुगड इथं जाहीर सभा घेतल्या. आसाममध्ये भाजप सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह हे आज आसाम मधील बराक खोरे परिसरात तीन जाहीर सभांना संबोधित करणार आहेत. केरळम् आणि पुडुचेरी मध्येही विविध ठिकाणी रोड-शो आणि जाहीर सभांचे आयोजन करण्यात आलं आहे. विकास, रोजगार आणि लोककल्याण यांसारख्या प्रमुख मुद्द्यांवर या प्रचारात विशेष भर देण्यात आला आहे. आसामच्या 126 जागांसाठी, केरळम इथल्या 140 जागांसाठी तर पुद्दुचेरीच्या 30 जागांसाठी येत्या गुरुवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे.

**<u>बारामती उमेदवारी</u>**

महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेसतर्फे बारामतीतून आकाश मोरे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघातून भाजपाकडून अक्षय कर्डिले यांना उमेदवारी अर्ज भरला तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून

गोविंद मोकाटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. दोन्ही ठिकाणी नामांकन अर्जांची छाननी आज होणार असून अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 9 एप्रिल आहे. मतदान 23 एप्रिल रोजी तर मतमोजणी 4 मे रोजी होणार आहे.

**पत्रकार परिषद**

देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं काल केंद्र सरकारतर्फे सांगण्यात आलं. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषदेत सरकारनं ही माहिती दिली. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर असून सरकार पुरवठा आणि दर यावर देखरेख ठेवत असल्याचं ग्राहक व्यवहार विभागाचे अतिरिक्त सचिव अनुपम मिश्रा यांनी यावेळी सांगितलं. देशात सुमारे 602 लाख मेट्रीक टन अन्नधान्य साठा उपलब्ध आहे असं अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या सहसचिव सी. शिखा यांनी सांगितलं एलपीजी घेऊन येणारी ग्रीन सान्वी आणि ग्रीन आशा ही दोन भारतीय निशाणधारी जहाजं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितरित्या बाहेर पडली असल्याची माहिती बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी दिली. आखाती समुद्रातील भारतीय जहाजं, खलाशी सुरक्षित असून परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा केल्याचं मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

**मुख्य निवडणूक आयुक्त**

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करण्यासाठी, विरोधीपक्ष सदस्यांनी सादर केलेला अविश्वास प्रस्ताव, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी काल फेटाळून लावला. राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन आणि लोकसभेचे सभापति ओम बिर्ला यांनी, ही ठरावाची सूचना दाखल करून घेण्यास नकार दिला. या ठरावाच्या सूचनेचा योग्य विचार केल्यानंतर आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व संबंधित बाबी आणि मुद्द्यांचं काळजीपूर्वक आणि वस्तुनिष्ठ मूल्यांकन केल्यानंतर हा ठराव दाखल करून घेता येणार नसल्याचं राज्यसभा सचिवालय आणि लोकसभा सचिवालय यांनी स्वतंत्र निवेदनांद्वारे कळवलं आहे. विरोधी पक्षाने पक्षपाती वृत्तीचा आरोप करत, मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरून दूर करण्यासाठीचा ठराव सादर केला होता.

**राज्यसभा**

महाराष्ट्रातल्या 5 खासदारांसह राज्यसभेच्या 19 नवनियुक्त सदस्यांनी काल संसद भवनात, पदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह रामदास आठवले, ज्योति वाघमारे, माया इवनात आणि रामराव वडकुटे यांना राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी खासदारकीची शपथ दिली

**ट्रम्प-इराण**

इराणने युद्धविराम करारावर सहमती न दर्शवल्यास, आणि होर्मूझची सामूद्रधुनी खुली न केल्यास, इराणला संपूर्णपणे उद्‌ध्वस्त केलं जाईल असा गंभीर इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. ते काल व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलत होते. युद्धविराम करारावर सकारात्मक विचार न झाल्यास इराणच्या ऊर्जा आणि वाहतूक पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यात येईल असं ट्रम्प यांनी सांगितलं. अमेरिकेच्या, इराण विरुद्धच्या लष्करी प्रयत्नांना पाठिंबा न दिल्याबद्दल राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावेळी, प्रशांत क्षेत्रातील मित्र राष्ट्रांवर, विशेषतः नाटो संघटनेतील राष्ट्रांवर टीका केली. इराणने युद्धबंदी करारावर सहमती दर्शवण्यासाठी अमेरिकेने इराणला, उद्या पहाटे पर्यन्तची मुदत दिली आहे. दरम्यान, इराणने अमेरिकेचे युद्धविरामाचे प्रस्ताव फेटाळून लावले असून, शत्रुत्व समाप्त करण्याची, पुनर्बांधणीसाठी सहकार्य करण्याची आणि अमेरिकेने लादलेले निर्बंध हटवण्याची मागणी केली आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या काल पहाटे झालेल्या हवाई हल्ल्यात इस्लामिक रेव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स या इराणच्या निम लष्करी दलाच्या गुप्तचर विभागाचे प्रमुख मेजर जनरल मजीद खादेमी यांचा मृत्यू झाला आहे.

**आरोग्य दिन**

आज जागतिक आरोग्य दिन आहे. जागतिक आरोग्य संघटना म्हणजे डब्ल्यूएचओ च्या स्थापना दिनी जगभरात जागतिक आरोग्य दिन साजरा केला जातो. सर्वांसाठी आरोग्य, विज्ञानाची कास धरा: ही यावर्षीची संकल्पना आहे. आरोग्य दिनानिमित्त आज देशात ठिकठिकाणी जागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**आंध्रप्रदेश-राजधानी मंजूरी**

आंध्र प्रदेश पुनर्रचना सुधारणा अधिनियम 2026 ला, राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी संमती दिली आहे. याद्वारे आता, अमरावतीला आंध्र प्रदेशची एकमेव आणि कायमस्वरूपी राजधानी म्हणून अधिकृतपणे घोषित करण्यात आलं आहे. नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विधेयकाला, संसदेच्या दोन्ही संभागृहांनी मंजूरी दिली होती.

**भाजपा**

भारतीय जनता पक्षाचा 47वा स्थापना दिन काल साजरा करण्यात आला. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यकर्त्यांना दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत शुभेच्छा दिल्या. समान नागरी कायदा आणि एक देश एक निवडणूक ही भाजपाची दोन कामं अद्याप अपूर्ण असून त्यासाठी मार्ग तयार करण्यात येत असल्याचं मोदी म्हणाले. भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांच्या हस्ते नवी दिल्लीत भाजपा मुख्यालयात ध्वजारोहण झालं. राज्यातील भाजपाच्या विविध कार्यालयांमध्येही काल ध्वजारोहण करण्यात आलं.

**मुष्टियुद्ध**

मंगोलियातील उलानबाटर इथं सुरू असलेल्या आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय खेळाडू चमकदार कामगिरी करत आहेत. 54 किलो वजनी गटात भारतांच्या प्रीती पवारनं, महिलांच्या 60 किलो वजनी गटात प्रिया घनघसनं तर अरुंधती चौधरीनं 70 किलो वजनी गटात, अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पुरुषांच्या 75 किलो वजनी गटात आकाश यानं तुरकेमिनिस्तान च्या खेळाडूचा 5-0 असा पराभव करत उपांत्य फेरी गाठली आहे. तर 90 किलो वजनी गटात हर्ष चौधरीनं किरगीस्तानच्या खेळाडूला 5-0 नं पराभूत करत स्पर्धेतलं आपलं पदक निश्चित केलं आहे.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये, कोलकाता इथल्या ईडन गार्डन्सवर पंजाब किंग्सविरुद्ध कोलकाता नाइट रायडर्सचा सामना काल पावसामुळे थांबवण्यात आला.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज देशभरात सर्वत्र पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अरुणाचल प्रदेश, लडाख आणि जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज असून दिल्ली, पंजाब, हरियाणा, चंदीगड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड आणि पश्चिम उत्तर प्रदेशमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि गारपिटीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.